संगीतकार चित्रगुप्त यांना सामाजिक चित्रपटाचा खान यांच्या संगीतासाठी गाजलेला *मेरा सलाम*.

तलतच्या गाण्याने अनेकदा रफींच्या गाण्यावर मात केली असली तरी अनेक गाण्यात तो आपल्या पातळ आवाजामुळे रफींच्या तुलनेत काहीसा कमी पडायचा. १९५७च्या *भाभी* या चित्रपटातील 'चल उड जारे पंछी कि अब ये देस हुआ बेगाना' हे गाणे याचे अत्युत्तम उदाहरण म्हणून सांगता येईल. सुरूवातीला हे गाणे तलतच्या आवाजात ध्वनिमुद्रित करण्यात आले होते. पण त्यांच्या आवाजातील पातळपणामुळे या चित्रपटाचे निर्माते ए. व्ही. मयप्पन यांना हे गाणे भावले नाही. यामुळे रफींच्या आवाजात हे गाणे नव्याने चित्रीत करण्यात आले. हे गाणे या चित्रपटात पार्श्वगीत म्हणून वापरण्यात आले होते.

□ इसाक मुजावर


भाभी(१९५७):

चित्रगुप्त या चित्रपटाचे संगीतकार होते. एस. एन. त्रिपाठी यांचे बोट धरून आपल्या संगीत जीवनाची वाटचाल सुरू करताना सुरूवातीला ते एस. एन. त्रिपाठी यांच्याप्रमाणेच धार्मिक चित्रपटांचे संगीतकार बनले होते. धार्मिक चित्रपटांतील संगीतामुळेच मद्रासच्या चित्रपटात त्यांचा प्रवेश झाला. १९५५च्या मद्रासच्या ए. व्ही. एम्.च्या *शिवभक्त* या चित्रपटाद्वारा. गोपाल सिंह नेपाली या चित्रपटाचे गीतकार असले तरी *शिवभक्त*साठी त्यांच्या नावाची शिफारस केली होती. लेखक-गीतकार म्हणून मद्रासमध्ये आपले साम्राज्य निर्माण करणाऱ्या राजेंद्र कृष्णनी नंतरच्या काळात अनेक चित्रपटात राजेंद्र कृष्ण यांच्या गीतरचनेशी चित्रगुप्त यांच्या संगीताचा सूर चांगलाच जुळला होता. *शिवभक्त*नंतरच्या *भाभी*तच त्या दोघांचा सूर सर्वात प्रथम जमला. आणि *भाभी*नेच चित्रगुप्तना सामाजिक चित्रपटातील यशस्वी संगीतकार बनवले. याचा अर्थ *भाभी* पूर्वी त्यांनी सामाजिक चित्रपटांना संगीत दिलेच नव्हते असा नव्हे. *हमारा घर, हमारी शान, तरंग, मनचला, नया रास्ता, मिस माला* यासारख्या काही सामाजिक चित्रपटांचे संगीत नियोजन चित्रगुप्तनी *भाभी*पूर्वी केले होते. पण हे सारे चित्रपट बी ग्रेड चित्रपटांच्या सेटअप मधील असल्यामुळे धार्मिक व पोषाखी चित्रपटांच्या पलिकडे चित्रगुप्त यांच्या संगीताचे अस्तित्व तेव्हा जाणवतच नव्हते. *भाभी*त ए. व्ही. एम.सारखे मोठे बॅनर त्यांना प्रथमच लाभल्यामुळे त्यांच्या संगीताचे अस्तित्व सामाजिक चित्रपटात प्रथमच जाणवले.

'चल उड जारे पंछी'शिवाय या चित्रपटात एकूण सात गाणी होती. या गाण्यापैकी 'चली चली रे पतंग मेरी चली रे' व 'छूपाकर मेरी आँखो में, वो पूछे कौन है जी हम' ही दोन गाणी रफी व लता यांनी गायली होती. आजचा हास्य अभिनेता सूरमा भोपाली जगदीप कधी काळी आपल्या चित्रपटातला एक बालकलाकार होता. *भाभी*त तो सर्वात प्रथम नंदाबरोबर नायक बनला. 'चली चली रे पतंग' हे गाणे या चित्रपटात जगदीप व नंदा यांनी पडद्यावर गायले होते. रफी, मन्ना डे व बलवीर यांनी गायलेले या चित्रपटातील 'है बहुत दिनो की बात, था इक मजनू और एक लैला' हे गाणे *लैला मजनू*च्या प्रेमकथेचे विडंबन करणारे एक विनोदी गाणे होते.



चित्रगुप्त



तलत मेहमूद

आणि आगा, ओमप्रकाश, भगवान यासारख्या त्या काळातील बहुसंख्य विनोदवीरांनी या गाण्यात हजेरी लावली होती हे या गाण्याचे वैशिष्ट्य होते. 'जारे जादूगर तेरी देखी जादूगरी' व 'कारे कारे बदरा जारे जा बदरा' ही या चित्रपटातील दोन सुरीली गाणी लताबाईंच्या आवाजात होती. या दोन सुरील्या गाण्यांच्या बरोबरच लताबाईंनी या चित्रपटातील 'टाई लगाके माना बन गए जनाब हीरो' हे एक उडते गाणेदेखील गायले होते. रफींनी गायलेले 'जवान हो या बुढिया, या नन्ही सी हो गुडिया' हे या चित्रपटातील गाणे एक उडते गाणे होते.

मेरा सलाम(१९५७):

तलतने गायलेली 'हर शाम शामेगम है, हर रात है अंधेरी' व 'सलाम मुझको ऐ दुनिया, अब आखिरी है सलाम' ही दोन गाणी १९५७च्या *मेरा सलाम* या चित्रपटात होती. आज देखील ही गाणी अनेकांना आठवतात. पण या गाण्याचा संगीतकार मात्र कोणाला आठवत नाही.

१९५४च्या *लकीरे* या चित्रपटात तलतने अशीच दोन सुरीली गाणी गायली होती. 'दिल की धडकन पर गा, उम्र भर मुस्करा' व 'दुनिया से जा रहा हूं दुनिया के गम उठाके' ही गाणी देखील आज अनेकांना आठवतात. पण या गाण्यांचा संगीतकार मात्र कोणाला आठवत नाही.

१९४५चा नूरजहाँचा *झीनत* हा चित्रपट हफीज खानने मीरसाहेब यांचेबरोबर संगीतबद्ध केला होता. आणि या चित्रपटातील 'आहे न भरी शिकवे तो किये' ही कव्वाली त्यांचीच होती. फाळणीनंतर गुलाम हैदर, खुर्शिद अन्वर, रशीद अत्रे यांसारखे भारतीय चित्रपटातील काही मुस्लीम संगीतकार पाकिस्तानला निघून गेले, पण हफीज खान मात्र पाकिस्तानला गेला नाही. भारतात राहूनच हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या चित्रपटांचे संगीत नियोजन त्याने केले. १९५७चा *मेरा सलाम* या चित्रपटापैकी त्याचा शेवटचा ठळक चित्रपट. तलतने या चित्रपटात दोन गाणी स्वतंत्रपणे गात असताना 'हुस्न कहते है मुझे नूर का शोला हूं मै' व 'हसीन

यशस्वी संगीतकार ठरवलेले ते *भाभीने*. ● तलतच्या गायकीसाठी व हफीज ● शकील बदायुनींनी गीतलेखन, गायन व अभिनय केलेला *पाक दामन*.

चांद सितारो का वासता आजा' ही दोन गाणी आशाबाईंच्या बरोबर गायली होती. 'एक लब्ज इश्क था जो अफसाना बन गया', 'दिल उनको दे आये उन्हे आँखो मे रख लाए', 'उन्हे दिल ने पुकारा है', 'सितारो तुम न सो जाना' ही या चित्रपटातील तीन गाणी आशाबाईंनी एकट्यानी गायली होती. तर 'बले, बले, बले, बुलबुले आँखो की परवाना आया' हे गाणे कोरसबरोबर. 'आग लगी शोला उठा, शमा पे परवाना आया' हे या चित्रपटातील गाणे शमशादच्या आवाजात होते. तर 'एक दिन दस्ते जुनूंसे, मर्दानिवालेसे मेरा सलाम कह देना' हे गाणे रफी, बंदे हसन व कोरसच्या आवाजात होते.

शेवन रिजवीनी या चित्रपटाची गीतरचना केली होती.

खाके' (*मेंहदी* १९४७), 'गोरे गोरे हाथो मे मेंहदी रचाय के' (*परिणीता* १९५३) यासारखी आपल्या अनेक चित्रपटातील लग्नाची गाणी गायली.

१९५७च्या *पाक दामन* या चित्रपटात एक लग्नाचे गाणे असेच धम्माल गाजले होते. या गाण्याचे बोल होते, 'मुबारक हो दुल्हा दुल्हन को ये शादी, मिले दिल से दिल जिंदगी मुस्करा दी' रफींनी हे गाणे गायले होते.

१९४६ साली *नेक परवीन* नामक एक चित्रपट पडद्यावर आला होता. एस. एम. युसूफ या चित्रपटाचे दिग्दर्शक होते. १९५७चा *पाक दामन* म्हणजे १९४६च्या *नेक परवीन*चा रिमेक होता. आणि एस. एम. युसूफनीच या रिमेकचे दिग्दर्शन केले होते. *नेक परवीन*मध्ये भूमिका करणारे एम. कुमार, मिर्जा मुश्रफ, वजीर मोहम्मद

हो मगर, परदा उठाओ सामने आओ' हे गाणे शमशाद व कोरसबरोबर गायले होते. 'भटके हुए राही तुझे मंजिलने पुकारा' हे गाणे बंदे हसनबरोबर आणि 'इक दिन लैला किसको मिलने, मैं पिया के पास कैसे जाऊं' हे गाणे बलवीरबरोबर. रफींबरोबर गाणे गात असताना शमशादने या चित्रपटातील 'मिल मिल आंखिया बलम जिया धडके, यूं न देखो हमे नजर भर भर के' हे गाणे एकटीने गायले होते. 'जहां वाले गरीबो की तू ही बिगडी बनाता है' व 'बिगडी हुई तकदीर का शिकवा न करेंगे' ही या चित्रपटातील दोन गाणी आशाबाईंच्या आवाजात होती. यापैकी त्यांच्या 'जहांवाले गरीबों की' या गाण्यात गरीबांचा उल्लेख होता. गरीबांचा उल्लेख असलेले असेच एक गाणे *नेक परवीन*मध्ये झीनत बेगम व हमीदाच्या आवाजात होते. या गाण्याचे



महंमद रफी



आशा भोसले



शमशाद बेगम

***पाक दामन*(१९५७):**

चित्रपटातील काही गाणी लग्नाची गाणी म्हणून गाजतात. १९४१च्या बॉम्बे टॉकीजच्या *झुला* या चित्रपटातील 'मैं तो दिल्ली से दुल्हन लाया रे बाबूजी' व 'देखो हमरे राजा की आज सगाई है' ही आपल्या चित्रपटातील गाजलेली लग्नाची पहिली दोन गाणी. त्यानंतर 'नई दुल्हन मैं हूं नन्ही नई दुल्हन' (*डॉ. कोटणीस की अमर कहानी* १९४६), 'हमारे अंगना हो हमारे अंगना आज बाजे बाजे शहनाई' (*शहनाई* १९४७), 'दुल्हा जी को दुल्हन भाई भैय्या' (*तुलसी* १९४१), 'दुल्हन बन के साजन के द्वार चली री बल

खान हे कलाकार *पाक दामन*मध्ये पुन्हा चमकले होते. *नेक परवीन*चे संगीतकार होते फिरोज निजामी, त्यांच्या संगीतात या चित्रपटात 'आवो सहेलिया बन्नी को मेहंदी लगावो' व 'आज दुल्हन बनी है सहेली हमारी' हे लग्नाचे दोन भागाचे गाणे होते. आणि तेव्हा ते चांगलेच लोकप्रिय ठरले होते. हीच लोकप्रियता *पाक दामन*मधील 'मुबारक हो दुल्हा दुल्हन को ये शादी' या गाण्याला देखील मिळाली होती. गुलाम महमद या चित्रपटाचे संगीतकार होते, त्यांच्या संगीतात 'मुबारक हो दुल्हा दुल्हन को ये शादी' हे गाणे एकट्याने गात असताना रफींनी या चित्रपटातील 'दिल मे रहते

बोल होते 'अल्ला दुहाई है दुनिया गरीबों को क्यू जीने नही देती.'

'खेल खिलाडी खेले जा, खेले जा, मौज करे दिलवाला' हे या चित्रपटातील गाणे गीता दत्तने कोरसबरोबर गायले होते. तर 'प्यार की चांदनी ले के रात आयेगी मेरे घर में खुशी की बारात आयेगी' हे गाणे सुधा मल्होत्राने गायलेले.

शकील बदायुनी या चित्रपटाचे गीतकार होते. या चित्रपटातील एका मुशायरात मुबारक बेगम, चांदबाला, रफी यांच्याबरोबर त्यांचा आवाज होता. आणि या मुशायऱ्यात ते स्वतः देखील पडद्यावर दिसले होते. ●